# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०३/२०२४ (शुक्रवार) सकाळ**

---

## पोस्टे बोरी हद्दीतील अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर नागपूर ग्रामीण पोलीसांची कायदेशिर कार्यवाही

मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार सा. नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण यांचे आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर आळा घालणेकामी नागपूर उपविभागात पेट्रोलिंग करीत असता दि. १४/०३/२०२४ रोजी पो.स्टे. बुट्टीबोरी हद्दीत मौजा आसोला गवळी टोला पारधी बेडा व शिवारात अवैधरित्या गावठी पद्धतीने भट्टी लावून मोहाफूल गावठी दारू गाळणारे ४ इसमांवर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारे एकुण ०३ महिला आरोपी व ०१ पुरूष हे मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढताना मिळुन आले. आरोपीचे ताब्यातून १) १३० लिटर मोहाफूल गावठी दारू ५० रू. लिटर प्रमाणे किंमती ६५००/—रू. २) ५९५० लिटर मोहाफूल सडवा रसायन किंमती २० रु. लिटर प्रमाणे १,१९,०००/—रू. ३) प्लास्टिक ड्रम व इतर साहित्य किंमती १९,८००/—रू. असा एकुण किंमती १,४५,३००/— रू. चा मुद्देमाल मिळून आल्याने नष्ट करण्यात आला. ०३ महिला आरोपी व ०१ पुरूष **आरोपी नामे— आकाश तुलाराम वाघमारे, वय ३२ वर्ष, रा. पारधी गवळीटोला, आसोला शिवार ता. हिंगणा जि. नागपुर** यांचे विरुद्ध पो.स्टे बुट्टीबोरी येथे कलम ६५ (एफ), (सी), (ई), (ब) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखडे, सहायक फौजदार चंद्रशेखर गडेकर, पोहवा मिलींद नांदुरकर, दिनेश अधापुरे, संजय बांते, अरविंद भगत, गजेंद्र चौधरी, रोहन डाखोरे, इक्बाल शेख, मयुर ढेकळे, महिला पोलीस हवालदार नितु रामटेके पोलीस अंमलदार राकेश तालेवार, अभिषेक देशमुख, निलेश इंगुलवार महिला पोलीस नायक वनिता शेंडे, चालक अमोल कुथे, आशुतोष लांजेवार, सुमित बांगडे यांचे सह कार्यवाही करण्यात आली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर